श्री. राजेश दातार

शास्त्रीय, उपशास्त्रीय व सुगम संगीत गायक

लहानपणापासूनच संगीताची आवड असणाऱ्या दातार यांना संगीताचा वारसा त्यांच्या आईकडून मिळाला

व त्यांनी शास्त्रीय संगीताचे शिक्षण ग्वाल्हेर घराण्याचे प्रख्यात गुरू पं. श्री. दत्तोपंत आगाशे, पं. श्री. मनोहरपंत दाबके, पं. श्री. राम माटे, आणि पं. श्री. मधुसूदन पटवर्धन यांच्याकडे घेतले. गांधर्व महाविद्यालयाच्या शास्त्रीय संगीताच्या संगीत विशारद या परिक्षेमध्ये त्यांनी विशेष नैपुण्य दाखवून प्रथम क्रमांक मिळवला. गायनाच्या शिक्षणाबरोबरच त्यांनी कायद्याचे शिक्षणही पुर्ण केले व पुणे विद्यापिठाची बी.एस.एल., एल.एल.बी., ही पदवी संपादन केली.

गैरफिल्मी अल्बमस् करिता गायन केले असून १० हून अधिक मराठी चित्रपटांकरिता पार्श्वगायन केले आहे.

■ २०११ साली समुद्र या चित्रपटाकरिता त्यांना राज्यशासना तर्फे सर्वोत्कृष्ट 'पार्श्वगायकाचा' 'पुरस्कार' मिळाला.

■ २०१२ साली चेन्नई येथे जेष्ठ संगीतकार मणी यांच्या हस्ते 'भजन भूषण' पुरस्कार प्राप्त झालेला आहे.

■ श्री. दातार आकाशवाणीचे मान्यताप्राप्त कलाकार असून त्यांना आकाशवाणीचा 'अ' दर्जा प्राप्ता आहे.

■ श्री. दातार हे 'राजकल्याण' या मल्टी ट्रॅक डिजिटल ऑडिओ रेकॉर्डिंग स्टुडिओ चे क्रिएटिव्ह डायरेक्टर आहेत.

Sarvotkarsh Public Charitable Trust

■ श्री. दातार यांनी सामाजिक जाणिवेपोटी सर्वोत्कर्ष चॅरिटेबल ट्रस्ट या संस्थेची स्थापना केली असून त्या योगे शास्त्रीय संगीत, उपशास्त्रीय संगीत व सुगम संगीताचा प्रसार व प्रचार करण्याचा त्यांचा मानस आहे.

आकाशवाणीने अखिल भारतीय स्तरावर भरविलेल्या शास्त्रीय संगीत व सुगम संगीत स्पर्धेमध्ये सन १९९१ मध्ये त्यांनी अखिल भारतीय स्तरावर एकाच वेळेला सुवर्णपदक मिळवले.

पुण्यात, महाराष्ट्रात, भारतात व परदेशामध्ये सुध्दा अनेक नामवंत संस्थांनी आयोजित केलेल्या सांगितिक कार्यक्रमांमधून त्यांनी आपली कला सादर केली आहे. त्यांनी शास्त्रीय संगीत, उपशास्त्रीय संगीत व सुगम संगीताचे असे सर्व मिळून जवळपास ३००० हून अधिक कार्यक्रम केले आहेत. अल्फा टि.व्ही., झी मराठी, डि.डि. १०, सह्याद्री, साम टि.व्ही., ई. टि.व्ही. मराठी इत्यादी टि.व्ही. चॅनेलवर तसेच एफ. टी. आय. आय. व आकाशवाणीच्या अनेक कार्यक्रमांमधून आपली कला सादर केली. त्यातील काही ठळक कार्यक्रमांची नावे : सुरताल, गीत गोपाळ, गीत रामायण, नक्षत्रांचे देणे, जीवन गाणे, माझे गाणे व सप्तसुर अशी आहेत.

Contact for Programme

Cell: +91-94220 28991

Email: rajeshdatar1@gmail.com








राजेश दातार